माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/२९/२०१९
दि.२०/०३/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.ऑजवन डॅनियल डिसोजा, ................अपिलार्थी
घर क्र.२०३, उत्तन मोठा क्रॉस जवळ,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

## -: विवेचन :-

श्री.ऑजवन डॅनियल डिसोजा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.०५/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मालमत्ता क्र.टी०१००२८५७२००० वर जुली विल्यम कुटीनो यांनी विनंती अर्ज केला होता. त्याची प्रत मिळणेबाबत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.०१/०३/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.१ यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२०/०३/२०१९ रोजी दुपारी ०३.४० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/३६/२०१९ दि.०७/०३/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०१९ बाबत जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे सायं.०४.०० वाजता मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) हे बैठकीस उपस्थित राहणार असल्याने सदरची सुनावणी दि.२०/०३/२०१९ रोजी दुपारी ०३.४० वाजता आयोजित करण्यात आली असुन अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.१ यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/४२/२०१९ दि.१९/०३/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.१ व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

Scanned by CamScanner

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद:-** माझ्या दि.०५/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार माहिती दिली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.१ यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती उपलब्ध करून दिल्याने व अपिलार्थी अर्जदार यांनी सुनावणी दरम्यान माहिती मिळाल्याचे मान्य केल्याने सदरचे अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

o/c

**प्रति:-**

१) श्री.ऑजवन डॅनियल डिसोजा,
घर क्र.२०३, उत्तन मोठा क्रॉस जवळ,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

३) सहा.जनमाहिती अधिकारी तथा
कर अनिरिक्षक, प्रभाग क्र.१

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

पोच
आवक लिपीक
प्रभाग समिती १
मिरा-भाईंदर महानगरपालीका

पोच
20/3/2019

22-4-2019

Scanned by CamScanner